वर्ष- ११ अंक- ४७ मुंबई, मंगळवार, ०७ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०२५ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

डोळ्यांखालील काळे डाग नाहीसे करण्याचे रामबाण उपाय

3 → विकासकांच्या मागण्यांपुढे लाभार्थी हतबल

आयात-निर्यात व्यवहारांसाठी आता डिजिटल बॉन्ड ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

यू ट्यूबवर व्हिडीओ पाहून चोरी

बनावट फोन पे मेसेजव्दारे कपड्यांची लूट



मुंबई। झटपट श्रीमंतीसाठी व कमी कामामध्ये जादा पैसे मिळवण्यासाठी एका चोरट्याने यूट्यूबवर व्हिडीओ पाहून नाशिक शहरातील अनेक दुकानदारांना तब्बल दोन महिने बनावट यूपीआय पेड मेसेज दाखवून फसवत महागडे कपडे घेतल्याचे समोर आले आहे. चोरटा फोन पे ॲपचा बनावट पेड स्क्रीनशॉट तयार करून पैसे दिल्याचा भासवत होता. महागडे कपडे स्वस्तामध्ये विक्री करताना चोरट्यासह एका विधिसंघर्षित बालकास नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने ताब्यात घेतले. दीपक परशुराम हांडोरे (वय २९, रा. बागुल नगर, विहीतगाव, ता. जि. नाशिक) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पथकाने दोघांच्या ताब्यातून मोबाईल फोन, लेडीज ड्रेस, साडया, लेडीज जीन्स व रोख रक्कम असा एकूण ५७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

- चोरटा कपड्यांच्या दुकानात कपडे खरेदी करून फोन पे चा मेसेज व स्क्रीन शॉट पाठवून करायचा फसवणूक
- दोन महिन्यांपासून व्यापाऱ्यांची लूट
- पथकाने संशयित दीपक हांडोरे यास वालदेवी नदीवरील लोखंडी पुलाजवळ ताब्यात घेतले.
- हांडोरे याने मुंबई नाका, अंबड, नाशिकरोड पोलीस ठाणे हद्दीत दुकानातून कपडे चोरल्याची कबुली दिली.
- संशयित हांडोरे अशिक्षित व विवाहित आहे.

चोरट्याकडून कपड्यांच्या दुकानांमध्ये जाऊन कपडे खरेदी करून पैसे हे फोन पे माध्यमातून दिल्याचे भासवले जायचे. मात्र, बँक खात्यावर पैसे जमा होत नव्हते. याप्रकरणी व्यापाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली होती. शहर गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने फसवणुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध सुरू केला. पथकाने कपड्यांच्या दुकानांमध्ये पाहणी करत सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले. प्रत्येक दुकानामध्ये एकाच युवकाच्या संशयास्पद हालचाली पथकाला दिसून आल्या. सहायक पोलीस उपनिरीक्षक गुलाब सोनार व हवालदार अतुल पाटील यांना बुधवारी (दि.१) दोन जण चोरीचे कपडे विक्रीसाठी वडनेर गेटजवळ असलेल्या वालदेवी नदीवरील लोखंडी पुलाजवळ उभे असल्याची माहिती मिळाली. ही बाब सोनार व पाटील यांनी प्रभारी अधिकारी हेमंत तोडकर यांना सांगितली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचत दोघांना ताब्यात घेतले. संशयित हांडोरे दुकानात कपडे खरेदी करायचा. क्यूआर कोड घेण्याचा बहाणा करून तो फोटो काढायचा. रेंजची अडचण आहे असे सांगत तो दुकानाच्या दारात जाऊन मेसेज तयार करून पाठवायचा आणि बनावट फोन पे पेमेंटचा स्क्रीनशॉट दाखवयाचा. दुकानांमध्ये गर्दी असल्याने व्यापारी लक्ष देत नव्हते. त्याचा त्याने गैरफायदा घेण्यास सुरुवात केली. हांडोरे आधी गावांमधील बाजारांमध्ये कपडे विक्री करायचा. त्यात त्याला यश आले नाही. झटपट पैसे कमविण्यासाठी हांडोरे यानेझटपट श्रीमंतीसाठी यूट्यूबवर व्हिडीओ पाहिले. त्यात त्याला एक ट्रिक मिळाली. फोन पे ॲप वापरून पेमेंट केल्याचा बनावट स्क्रीनशॉट काढण्यास सुरूवात केली. दोन महिन्यांमध्ये अनेक दुकानांत कपडे घेतले जायचे पण पेमेंट बँक खात्यावर जमा होत नव्हते. ही बाब अनेक व्यापाऱ्यांच्या उशिरा लक्षात आली. यासंदर्भात व्यापाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. चोरटा दुकानांमधून चार हजार, पाच हजार, सात हजार व आठ हजार रूपयांमध्ये कपडे खरेदी करायचा. पोलीस तपासात प्रत्येक दुकानात एकच युवक दिसून आला. मात्र, बाहेर एक तरुण असल्याचेही निष्पन्न झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण व मानवी कौशल्याच्या आधारे चोरट्याला पकडले. चोरट्यांना पकडल्यामुळे आगामी सण उत्सवाच्या काळात व्यापाऱ्यांची लूट होण्यापासून रोखण्यात गुन्हे शाखा युनिट दोन ला यश आले आहे. व्यापाऱ्यांनी सण उत्सवाचे काळात ऑनलाईन व्यवहार करताना दक्षता घ्यावी. बँक खात्यावर पैसे जमा झाल्याची खात्री करावी.

नाशकात १२ पोलीस अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली, आयुक्तांनी काढला आदेश



नाशिक । नाशिकमध्ये पोलीस अधिकाऱ्यांची अचानक बदली करण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पोलीस आयुक्तांनी अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली केल्याने एकच खळबळ उडाली आहे. एकूण १२ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली असून, यामध्ये सात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या बदलीमागे काही दिवसांपूर्वी तीन आमदारांनी घेतलेली भेट कारणीभूत आहे. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी संदर्भात तिन्ही आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती.

नाशिकमधील वाढत्या गुन्हेगारीला आळा बसवण्यासाठी आता पोलीस आयुक्त ॲक्शन मोडवर आले आहेत. १२ पोलीस अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. यामध्ये ७ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर त्यांची तडकाफकडी बदली करण्यात आली आहे. तडकाफडकी बदली झाल्याने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे.

ते १२ अधिकारी कोण? वाचा नाव

- पोलीस निरीक्षक मधुकर शिवाजी कड - अंबड पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग नवलसिंग राजपूत - गंगापूर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक मनोहर रामा कारंडे - अंबड पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक प्रकाश आत्माराम अहिरे - भद्रकाली पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक उमेश नानाजी पाटील - सायबर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक संतोष बबनराव नरुटे - मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक रणजित पंडीत नलवडे - सातपूर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक संजय मारुती पिसे - आडगांव पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक विश्वास रोहिदास पाटील - एमआयडीसी चुंचाळे पोलीस चौकी, नाशिक शहर
- म पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे - इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक तुषार मुरलीधर अढावु - शहर वाहतूक शाखा, युनिट क्रमांक १, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक रियाज ऐनुद्दीन शेख - सातपूर युनिट, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर

आमदारांनी घेतली होती मुख्यमंत्र्यांची भेट

वाढत्या गुन्हेगारीसंदर्भात आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढत्या गुन्हेगारी संदर्भात मंत्री दादा भुसे आणि स्थानिक भाजपाच्या तिन्ही आमदारांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. त्यानंतरच ही बदली करण्यात आली आहे.

राज्यात ३९४ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही, ग्रामीण भागांत स्थिती बिकट

पुणे-मुंबईत धक्कादायक आकडेवारी समोर



मुंबई । शालेय शिक्षणमंत्री गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षणाची कास धरत असताना आणि शिक्षण विभागातील विविध घटक दरदिवशी नवनवीन उपक्रमांची सुरुवात करत असताना राज्यातील ग्रामीण भागांमध्ये शाळांची परिस्थिती बिकट होत असल्याचे चित्र आहे. 'यूडायस-प्लस'वरील ३० सप्टेंबरपर्यंतच्या नोंदणीच्या आकडेवारीनुसार, राज्यातील सर्व प्रकारच्या श्रेणींतील ३९४ शाळांमध्ये एकाही विद्यार्थ्याची नोंदणी झाली नसल्याचे समोर आले आहे. सुमारे आठ हजार शाळांची पटसंख्या दहाच्याही खाली आहे.

ग्रामीण भागातील शाळा रिकाम्या होत असल्याचं प्रमाण चिंताजनक

राज्यात एकूण दोन कोटी ११ लाख ८६ हजार ९४३ विद्यार्थ्यांची नोंद झाली. ही संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे सात हजारांनी अधिक आहे. मात्र त्याचवेळी पाच लाख विद्यार्थ्यांची नोंदणी अजूनही अपूर्ण आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या लाखोंनी वाढेल, असे संकेत असले, तरी ग्रामीण शाळा रिकाम्या होण्याचे प्रमाणही चिंताजनक आहे.

एकाही विद्यार्थ्याची नोंदणी नाही; ग्रामीण भागांत स्थिती बिकट

'यूडायस-प्लस'वरील नोंदणीनंतर हाती आलेल्या आकडेवारीनुसार, पुण्यात सर्वाधिक ३७ शाळांत एकाही विद्यार्थ्याची नोंद झालेली नाही. रत्नागिरीतील २४, नागपूरमधील २३ शाळाही विद्यार्थ्यांविना आहेत. बुलढाण्यात २१ शाळांत शून्य पटसंख्या आहे. या आकडेवारीनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील तब्बल ७१३ शाळांची पटसंख्या १०च्या खाली आहे. पुण्यात ६२७, रायगडमध्ये ६८२, तर सिंधुदुर्गमध्ये ५६९ शाळांत एवढीच मोजकी विद्यार्थीसंख्या आहे.

मुंबई उपनगरांतील ३६०, मुंबई शहरातील ३४, ठाण्यातील १९९ आणि पालघरमधील १२४ शाळांतही विद्यार्थ्यांची संख्या १०च्या खालीच आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी २०० ते ३००, तर काही ठिकाणी १०० ते १५० शाळा अशा श्रेणीत आहेत. राज्यात एकूण सात हजार ९४६ शाळांत केवळ १ ते दहा विद्यार्थी नोंदले गेले आहेत.

शहरनिहाय शाळा

- मुंबई शहर - ५
- मुंबई उपनगर - २२
- ठाणे - १५
- पालघर - १९
- रायगड - १२

गॅस गँगच्या म्होरक्याला आश्रय, आर्थिक मदत... बिल्डरला अटक



मुंबई। इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाथर्डी रोड भागात झालेल्या राशिद खान खूनप्रकरणात फरार, मुख्य संशयिताला आर्थिक मदत व आश्रय देणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने सापळा रचून अटक केली. किस्मत अली आजम अली अन्सारी (३७, रा. सावरकर चौक, सिडको) असे संशयित बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाथर्डी रोडवरील राशिद खान खूनाच्या गुन्ह्यातील मुख्य संशयित गयासउद्दीन ऊर्फ गॅस व हासीम वारसी फरार होते. त्यांच्या शोध मोहिमेदरम्यान तपासात किस्मत अली हा संशयित आरोपीला पळून जाण्यास मदत करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचे अस्तित्व लपवण्यासाठी आर्थिक मदत व निवाऱ्याची सोय करून देत असल्याची माहिती समोर आली.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने सिडकोतील राणाप्रताप चौक परिसरात सापळा रचून किस्मत अलीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्हा घडल्यावर फरार संशयिताला आश्रय व आर्थिक मदत दिल्याची कबुलीही दिली. किस्मत अली हा बांधकाम व्यवसायिक असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

प्रारूप मतदान यादी ८ ऑक्टोबरला

नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी यादी प्रकाशित होणार



मुंबई। महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी जाहीर केले की, २४७ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी प्रारूप प्रभागनिहाय मतदार याद्या ८ ऑक्टोबर रोजी प्रकाशित होतील.एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, नागरिक १३ ऑक्टोबरपर्यंत प्रारूप याद्यांवर हरकती आणि सूचना सादर करू शकतात. आयोगाने यायाद्या तयार करण्यासाठी १ जुलै ही पात्रता तारीख निश्चित केली होती, जी विद्यमान विधानसभा मतदार याद्यांवर आधारित असेल. अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या २८ ऑक्टोबर रोजी प्रकाशित केल्या जातील, असे त्यात म्हटले आहे.

प्रभागनिहाय याद्या तयार करताना, मतदारांची नावे आणि पत्ते विधानसभा मतदारसंघ याद्यांमधून कायम ठेवले जातात. आयोग मसुद्यातील नावे किंवा पत्त्यांमध्ये कोणतीही भर घालणार नाही, वगळणार नाही किंवा दुरुस्त्या करणार नाही, असे त्यात म्हटले आहे.

नागरिक लिपिकीय चुका, चुकीच्या प्रभागात नियुक्त केलेले मतदार किंवा विधानसभा यादीत असूनही प्रभाग यादीत नावे गहाळ होणे यासारख्या त्रुटींबाबत आक्षेप आणि सूचना दाखल करू शकतात.गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्यास सांगितले होते. मुंबई महानगरपालिकेसह जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी असेही सांगितले की, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांमधील सदस्यांसाठी जागा राखीव ठेवण्याची घोषणा १३ ऑक्टोबर रोजी केली जाईल. १३ ऑक्टोबर रोजी सोडतीनंतर आरक्षणाची मसुदा अधिसूचना प्रकाशित केली जाईल, तर नागरिकांना १४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान हरकती आणि सूचना दाखल करण्याची परवानगी असेल, असे त्यात म्हटले आहे.

सादरीकरणांचे पुनरावलोकन केल्यानंतर, अंतिम आरक्षण यादी ३ नोव्हेंबर रोजी सरकारी राजपत्राद्वारे अधिसूचित केली जाणार आहे.

गुन्हेगारीमुक्तीसाठी ८ दिवसांत ठोस कारवाई



नाशिक। नाशिक शहरातील वाढलेली गुन्हेगारी व व्यसनांवर आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजप नाशिक महानगरतर्फे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदनाव्दारे करण्यात आली. शहरात ८ ते १० दिवसांत सकारात्मक बदल दिसेल, असे आश्वासन पोलीस आयुक्त कर्णिक यांनी दिल्याचे आ. प्रा. देवयानी फरांदे यांनी सांगितले. यावेळी आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे व आमदार राहुल ढिकले, शहर अध्यक्ष सुनील केदार यांनी नाशिक शहरातील गुन्हेगारीचा आढावा घेतला. नाशिक शहर हे सांस्कृतिक, औद्योगिक व शैक्षणिक केंद्र असून, येथील शांततेची परंपरा कायम ठेवणे ही काळाची गरज आहे. नाशिक शहरात चोरी, दरोडे, लूटमार, सोनसाखळी ओढणे, एमडी ड्रग्ज, अवैध धंदे, टोळीयुद्ध यामध्ये वाढ झाली आहे. तरुणाईमध्ये व्यसनाधीनतेचे वेगाने वाढत आहे. मादक पदार्थांचे सेवन व विक्री यामुळे तरुण पिढी गुन्हेगारीकडे ओढली जात आहे. ही परिस्थिती नाशिकच्या भविष्यासाठी चिंताजनक व धोकादायक आहे.

अशा आहेत मागण्या

- शहरातील संवेदनशील भागात गस्त वाढवावी. २४ तास गस्ती पथकांची नेमणूक करावी. सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवून २४ तास कार्यरत ठेवून नियमित देखभाल करावी.
- अंमली पदार्थांचे सेवन, विक्री व त्यामागील रॅकेट्सवर कठोर कारवाई करावी. व्यसनांना आळा घालण्यासाठी विशेष मोहिमा व जनजागृती उपक्रम राबवावव्यात. गुन्हेगारी टोळ्यांची भांडणे व गटबाजीवर नियंत्रणासाठी विशेष कार्यबल स्थापन करावे.
- नागरिकांच्या सुरक्षेसाठी मोहल्ला सुरक्षा समित्या सक्रिय कराव्यात. नागरिकांनी दिलेल्या तक्रारींवर कारवाई करावी.

काय म्हणाल्या आ. प्रा. देवयानी फरांदे

- नाशिक शहर सुरक्षित राहण्यासाठी कर्तव्य म्हणून पोलीस आयुक्तांची भेट घेतली. पोलीस आयुक्तांशी नाशिक शहरातील वाढलेली गुन्हेगारी व वाहतूक समस्या सोडवण्याबाबत चर्चा झाली. नाशिक जुनी ओळख पुसली जावू नये. कायदा हातात घेणाऱ्यांवर पोलीस कारवाई करताना दिसून येतील.
- गुन्हेगाराला कोणताही पक्ष नसतो. जे चुकतील त्यांच्यावर भाजपकडून योग्य वेळी उपचार आणि ऑपरेशन केले जाते. भाजपकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींची तपासली जात आहे.

दिवाळीनंतर लगेच निवडणुकीचा धुराळा

जिल्हा परिषद अन् पंचायत समितीची आरक्षण सोडत ठरली



मुंबई, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याआधी राज्यातील ३२ जिल्हा परिषद आणि ३३६ पंचायत समितीची मतदारसंघ निश्चित झाल्यानंतर मतदारसंघावर आरक्षण कधी पडणार याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागून राहिले होते. आता राज्य निवडणूक आयोगाने अंतिम आरक्षणाची तारीख निश्चित केली आहे. नोव्हेंबरपर्यंत अंतिम आरक्षण प्रसिद्धी करावे, असे परिपत्रकच राज्यातील ३२ जिल्हा परिषदांना देण्यात आले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेला आणखी गती येणार आहे.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा तसेच त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली. नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे. संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर रोजी वृत्तपत्रांत आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करणार आहेत. १३ ऑक्टोबर रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हरकती आणि सूचना दाखल करता येणार आहे.

प्राप्त हरकती आणि सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाणार आहेत. राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या तसेच थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती तसेच सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. प्राभगनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाणार आहे.

डायबेटीसचे उच्चाटन करणारे औषध



भारतातील मोठी आरोग्य समस्या बनलेल्या मधुमेहाचे पूर्ण उच्चाटन करू शकेल असे औषध प. बंगालच्या विश्वभारती विश्वविद्यालय आणि आसामच्या तेजपूर विश्वविद्यालयातील संशोधकांनी तयार केले असून त्याच्या उंदरांवर घेण्यात आलेल्या चाचण्या अत्यंत यशस्वी ठरल्या आहेत. संशोधक समीर भट्टाचार्य यांनी यासंदर्भात दिलेल्या माहितीनुसार, जास्वंद जातीच्या झाडाच्या पानांपासून हे औषध तयार केले गेले आहे. या वनस्पतीला स्थलपद्म या नावानेही ओळखले जाते आणि आयुर्वेदात फार पूर्वीपासून ही वनस्पती अनेक रोगांवर उपचार करण्यासाठी वापरली जात आहे. सध्या मधुमेह नियंत्रणासाठी जी अँलोपॅथी औषधे वापरली जातात ती मुख्यत्वे रक्तशर्करा नियंत्रित करण्याचे काम करतात, मात्र त्यामुळे मधुमेह बरा होऊ शकत नाही. स्थलपद्म वनस्पतीच्या पानांपासून पॉलिफिनोल तत्त्वापासून मिळवलेले फ्लूरेलिक ॲसिड हे नैसर्गिक तत्त्व इन्शुलिन अधिक तयार करण्यास मदत करते असे उंदरांवर केलेल्या प्रयोगातून सिद्ध झाले आहे. दोन आठवडे उंदरांना हे औषध दिले गेले तेव्हा त्यांच्या इन्शुलिन तयार करण्याच्या वेगात आश्चर्यकारक वाढ झाल्याचे दिसून आले आहे. हे औषध आणखी काही काळ टेस्ट करून मग ते बाजारात आणण्याविषयी परवानगी घेतली जाईल, असे सांगितले जात आहे. भारतात मधुमेहाचे प्रमाण गंभीर असून नवे औषध मधुमेहींसाठी वरदान ठरेल, असेही सांगितले जात आहे.

केस गळतीमुळे काळजीत आहात, तर हे ५ आयुर्वेदिक उपाय करून पहा

निरंतर केस गळत असल्यामुळे तुम्ही तणावात राहत असाल तर आयुर्वेदात याचे प्रभावी उपचार तुम्हाला नक्की मिळतील. बऱ्याच हर्बल वस्तू आहेत ज्यांच्या प्रयोगामुळे केसांचे गळणे आपण कमी करू शकतो. जाणून घ्या, आयुर्वेदाच्या आधारावर पाच सोपे उपाय जे केसांची गळती कमी करू शकतात.



भृंगराज : मजबूत आणि दाट केसांसाठी आयुर्वेदात भृंगराजचे फार महत्त्व आहे. भृंगराज तेलामुळे फक्त टक्कलच पडणे कमी होते असे नाही तर वेळेआधी केसांना पांढरे होण्यापासूनही बचाव होतो.

ब्राह्मी : ब्राह्मी आणि दह्याचे पॅक तयार करून केसांवर लावल्याने केसांचे गळणे कमी होईल. ब्राह्मीच्या तेलाने नियमित मसाज केल्यामुळे देखील केस दाट होतात.

आवळा : आवळ्यात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडेंट्स भरपूर मात्रेत आहे जे केसांची वाढ करण्यास मदत करतात. आवळ्यात हिना, ब्राह्मी पाऊडर व दही मिसळून पॅक तयार करून केसांवर लावावे.

कडूलिंब : कडूलिंबाच्या प्रयोगाने केस फक्त दाटच होत नाही तर त्यामुळे कोंडा व उवांची समस्यादेखील दूर होते. कडूलिंबाच्या पानांची पावडर तयार करून घ्या. त्यात दही किंवा नारळाचे तेल मिसळून मसाज करायला पाहिजे.

रीठा : रीठ्याच्या प्रयोगाने केस काळे आणि दाट होतात. रीठा पावडरमध्ये तेल मिसळून डोक्याची मसाज केल्याने केसांची गळती थांबते.

सावध व्हा! असे जेवण बनवाल तर ते होईल विषारी !



जेवण बनवण्याच्या अशा काही पद्धती आहेत ज्यामुळे जेवण स्वादिष्ट तर बनत असेल पण ती पद्धत पदार्थांना विषारी करते. पाहू काय आहेत या पद्धती.



▮ अनेक लोक जेवण गरम करण्यासाठी किंवा शिजवण्यासाठी मायक्रोवेव्हचा उपयोग करतात. परंतु आपल्याला माहीत आहे का की यात तयार केलेले पदार्थ पूर्णपणे विकृत असतात. हे खाल्ल्याने रक्त पेशींमध्ये, एलडीएल आणि एचडीएल यात परिवर्तन येतं.

▮ जळके किंवा करपलेले पदार्थ खाऊ नये. अनेक लोक मीट असेच तयार करतात. ही पद्धत विषारी आहे कारण याने आहारातील प्रोटीन विकृत होते, परिणामस्वरूप पचायला त्रास होतो. याने रोगप्रतिकार प्रणालीवर देखील प्रभाव पडतो. या प्रक्रियेत मीटमध्ये आढळणारे फॅट्सचे कण ऑक्सीकृत होऊन उत्तेजक बनतात.

▮ यात काहीच शंका नाही की बार्बेक्यू पद्धतीने तयार केलेल्या पदार्थांचा स्वाद तोंडाला पाणी सुटेल असा असतो पण असे पदार्थ सूज आणि कर्करोगाला कारणीभूत असतात. याऐवजी मंद आचेवर शेकलेले पदार्थ खायला हवे जे कमी मात्रेत विषारी पदार्थ उत्पन्न करतात.

▮ तेलात तळणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. परंतु या प्रक्रियेत आपला पदार्थ ऑक्सीडाइज्ड फॅट्स, ग्ल्युकॅटेड शुगर आणि विकृत प्रोटीनचा स्रोत बनून जातो. ज्या तापमानावर पदार्थ तळले जातात त्यात विषारी तत्त्वांची वृद्धी होते ज्याने कर्करोगाचा धोका वाढतो.

▮ ब्राइलिंग ही पद्धत ही आरोग्यासाठी योग्य नाही. यात मीट शिजवण्यासाठी चारी बाजूने आग पेटवली जाते. याने मीटच्या बाहेर ग्लुकोमेट निर्मित होते आणि फॅट्स ऑक्सीकृत होतात.

डोळ्यांखालील काळे डाग नाहीसे करण्याचे रामबाण उपाय

आताच्या युगात फक्त महिलाच नाही तर पुरुष देखील आपल्या त्वचेची काळजी घेत असतात. आपल्या चेहऱ्यावरील त्वचा ही अत्यंत नाजूक असते. त्याहूनही अधिक नाजूक आणि पातळ त्वचा डोळ्यांच्या भोवतालची असते. बदलत्या जीवनशैली त्याचप्रमाणे कमी झोप, संगणकावर सतत काम करून, मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर थकवा याचा परिणाम डोळ्यांखालील त्वचेवर होतो आणि डोळ्यांखाली काळे घेरे तयार होतात.

डोळ्यांखाली काळे घेरे आल्यास करा हे उपाय

▮ एक चमचा गुलाब जल आणि काकडीच्या रसाचे मिश्रण करावे. कापसाने डोळ्यांखाली लावावे.

▮ अर्धा चमचा काकडीचा रस, दोन थेंब मध, बटाट्याचा रस आणि बदामाचे तेल व्यवस्थित मिसळून घ्या. कापसाच्या बोळ्याने हे मिश्रण डोळ्यांखाली लावल्याने फरक पडतो.

▮ किसलेला बटाट्याने डोळ्यांखाली हलक्या हाताने मसाज करावी. नियमित असे केल्यास समस्या दूर होईल.

▮ बदाम रात्री दुधात भिजवून ठेवावे. सकाळी त्याची पेस्ट करून लावावी.

▮ मध आणि बदामतेल सम प्रमाणात घ्या. याला व्यवस्थित मिसळा. या मिश्रणाचा नक्कीच फायदा होतो.



दररोज भाजलेले चणे खाण्याचे असेही फायदे

जर तुम्ही केवळ चवीसाठी भाजलेले चणे खात असाल, तर तुमच्या दररोजच्या रुटीनमध्ये त्यांचा समावेश नक्की करा. दररोज भाजलेले चणे खाणे शरीरासाठी अतिशय आवश्यक आहे. भाजलेले चणे पौष्टिक असतात. भाजलेले चणे पोटाचे आजार, बद्धकोष्ठता दूर करण्याचेही काम करतात. बाजारात साल असलेले आणि विना सालाचे असे दोन प्रकारचे भाजलेले चणे मिळतात. शक्यतो साल असलेले भाजलेले चणे खाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे.

भाजलेल्या चण्यामध्ये कार्बोहायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, आर्यन, व्हिटॅमिन मोठ्या प्रमाणात असतं. वसंत कुंज येथील इंडियन स्पाइनल इंज्युरी सेंटरच्या सीनियर डायटीशियन डॉ. हिमांशी शर्मा यांनी, एका व्यक्तीने दररोज ५० ते ६० ग्रॅम चणे दररोज खाणं फायदेशीर असल्याचं सांगितलं.



रोगप्रतिकार क्षमता वाढते : दररोज नाश्ता करताना किंवा दुपारी जेवणाच्या आधी ५० ग्रॅम चणे खाण्याने रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. रोगप्रतिकारशक्ती वाढल्याने अनेक आजारांपासून बचाव होतो. त्याशिवाय बदलत्या हवामानानुसार होणाऱ्या शारीरिक समस्याही दूर होतात.

वजन कमी करते : भाजलेले चणे खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होते. भाजलेल्या चण्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी वितळण्यास मदत होते.

मूत्रसंबंधी रोग : भाजलेले चणे खाल्ल्याने मूत्रसंबंधी समस्या दूर होतात. ज्यांना सतत लघवीला होण्याची समस्या आहे, त्यांनी भाजलेले चणे आणि गुळ दररोज खाल्ल्याने काही दिवसांत फरक दिसेल.

बद्धकोष्ठता : ज्यांना बद्धकोष्ठतेची समस्या आहे, त्यांनी दररोज चणे खाल्ल्याने फायदा होतो. बद्धकोष्ठता शरीरातील अनेक आजारांचे मूळ कारण ठरते. बद्धकोष्ठता असल्यास दिवसभर आळसपणा, अस्वस्थ जाणवते.

पचनशक्ती वाढवते : भाजलेले चणे पचनशक्ती संतुलित करण्याचं काम करतात. चण्यामुळे रक्त शुद्ध होतं. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यासही फायदा होतो. चण्यामध्ये फॉस्फरस असते, ज्यामुळे हिमोग्लोबिन वाढतं आणि किडनीतील अतिरिक्त मीठही निघून जातं.

मधुमेहासाठी फायदेशीर : मधुमेही रुग्णांसाठीही भाजलेले चणे गुणकारी आहेत. भाजलेले चणे ग्लुकोजचं प्रमाण धरून ठेवतं त्यामुळे मधुमेहही नियंत्रणात राहतो. मधुमेहींनी दररोज भाजलेले चणे खाण्याने ब्लड-शुगर लेव्हल कमी होते.

हिरवे बदाम करते वेट लॉसमध्ये मदत, जाणून घ्या त्याचे हे ५ फायदे

हिरवे बदाम नट्स असून पोषक तत्त्वांपासून भरपूर असतात. वाळलेल्या बदामाच्या तुलनेत यात बरेच पोषक तत्त्व जास्त असतात. काय काय आहेत याचे फायदे आणि याचे सेवन कसे केले पाहिजे जाणून घ्या...

▮ हिरवे बदाम आरोग्यासाठी उत्तम राहतात कारण हे अँटीऑक्सिडेंटने भरपूर असतात आणि शरीरातून विषाक्त पदार्थांना बाहेर काढू शकतात. हे रोग-प्रतिरोधक क्षमतेला वाढवतात.

▮ हे बदाम वजन कमी करण्यासाठी चांगले असतात, कारण यात वसा सामील आहे. हे अतिरिक्त वसाला बाहेर काढण्यास मदत करतात.

▮ हिरवे बदाम पोटासाठी देखील चांगले असतात, कारण यात जास्त प्रमाणात फायबर असत, जे पचन प्रक्रियेला व्यवस्थित करते आणि कब्जपासून मुक्ती देते.

▮ हे केसांसाठी देखील फायदेशीर आहे, कारण यात व्हिटॅमिन, खनिज आणि इतर बरेच काही पोषक तत्त्व असतात.

▮ हिरवे बदाम फॉलिक ॲसिडचा चांगला स्रोत आहे, जो गर्भाच्या मस्तिष्क आणि न्यूरोलॉजिकल विकासात मदत करतो. यात उपस्थित व्हिटॅमिन ई मुलांचा अस्थमाच्या जोखमीपासून बचाव करतो.



निरोगी हृदयासाठी कमळदेठ



आयुर्वेदाच्या ग्रंथांमध्ये 'कमळ' हे हृदयासाठी उपकारक सांगितले आहे. हे प्रत्यक्षात सत्य आहे काय? कमळदेठांचे शास्त्रीय पृथक्करण केले असता असे लक्षात येते की, १०० ग्रॅम कमळदेठांमध्ये तब्बल ३००० मिली 'पोटॅशिअम' असते. पोटॅशिअम हे रक्तामधील मिठाचे प्रमाण वाढू देत नाही, ज्यामुळे रक्तातले पाणी वाढत नाही. त्यामुळे रक्तवाहिन्यांवरचा ताण कमी होतो.

हृदयासाठी जोराने पंपिंग करावे लागत नाही, हृदयाला आराम मिळतो व रक्तदाबसुद्धा नियंत्रणात राहतो. थोडक्यात, मीठा (सोडिअम)च्या बरोबर उलटा परिणाम पोटॅशिअम करते. संशोधनानुसार सिद्ध झाले की, पोटॅशिअमच्या कमतरतेमुळे हार्टअॅटॅक, पॅरालिसिसचा अॅटॅक येऊ शकतो. म्हणूनच कमळदेठ हृदयासाठी उपकारक आहे, हे सत्य आहे.

तरुणाईचा लाडका 'गॉगल'

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा, ऋतू कोणताही असो, गॉगल्सचे चाहते कमी नाहीत. कधी काळी गॉगल ही 'फॅशन' या सदरात मोडणारी वस्तू होती, पण आज ती फॅशनबरोबरच अत्यंत गरजेची वस्तू बनली आहे. गॉगल ही तरुणाईची लाडकी गोष्ट बनली आहे.

खेळाडू, खास करून क्रिकेटपटू तर मैदानात गॉगल लावून खेळताना दिसतात. ते पाहून तरुणाईला गॉगल वापरण्याचा आणखी उत्साह येतो. गॉगल प्रत्येकाच्या आवडीची वस्तू बनली आहे. प्रत्येक जण त्याच्या आवडीने गॉगल घेतो. काही जण तर अगदी महिन्याच्या महिन्याला गॉगल बदलतात. त्यांच्या किमतीही काही शेकड्यापासून तर काही हजारांपर्यंत असतात.

गॉगल ही गरजेची गोष्ट आहे हे मान्य केले, तरी पण प्रश्न असा पडतो की, गॉगल वापरताना आपण खरंच डोळे उघडे ठेवून गॉगल घेतो का? आणि वापरतो का? रस्त्याच्या कडेला मिळणारे वा एखाद्या पेट्रोल पंपाच्या बाजूला मिळणारे अगदी कमी किमतीचे गॉगल अनेक जण वापरतात. ते खरोखर उपयुक्त असतात का? फायदेशीर असतात का? त्यापासून काही त्रास तर होणार नाही?



याचा विचार किती जण करतात? रस्त्यावरच्या गॉगल्सची एक गोष्ट झाली. आपण मोठ्या पॉश दुकानातून भरभक्कम रक्कम देऊन गॉगल खरेदी करतो, तेव्हाही ते आपल्या डोळ्यांना 'सूट' होतात का, याचा विचार कधी करतो का? डोळ्यांचे रक्षण हा गॉगल वापरण्यामागचा सर्वात मुख्य हेतू. हीच गॉगलची सर्वप्रथम गरज. बाकी स्टाईल वगैरे दुय्यम गोष्टी. पण त्यांनाच अधिक महत्त्व दिले जाते, हे एक कटू सत्य आहे. गॉगल घेण्यामागे कारण काय? बरेच जण स्टाईलसाठी गॉगल घेतात. काही जण डोळ्यात कचरा जाऊ नये, ऊन लागू नये, तसेच थोडी स्टाईल पण असावी म्हणून गॉगल घेतात.





गॉगल मुळीच न वापरणारा असा देखील एक वर्ग आहे

खरं तर गॉगल ही एक अशी वस्तू आहे, जी प्रत्येकाने वापरावी, अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत. फक्त आणि फक्त एकाच मुख्य हेतूसाठी, ते म्हणजे डोळ्यांचे संरक्षण! आपण दिवसभरात भरपूर वेळ उन्हामध्ये वावरत असतो, मुख्य करून प्रवास करताना. घर-ऑफिस-घर हा तर आपला नित्यनेमाचा अगदी न चुकणारा दररोजचा प्रवास. कधी सार्वजनिक वाहनाने, कधी स्वतःच्या दुचाकी-चारचाकी वाहनाने आणि प्रसंगी काही अंतर चालतसुद्धा आपण जात असतो. आपले शरीर तर कपड्यांनी झाकलेले असते, पण डोळ्यांचे काय? ते तर सरसकट रोज त्रास सहन करत असते. त्यापासून रक्षण करण्यासाठी गॉगल उपयुक्त ठरतात, नव्हे आवश्यकच असतात.

सर्वसाधारणपणे आपल्या रोजच्या जेवणात दह्याचा समावेश असतो. परंतु, अनेक वेळा आपल्याकडून दह्याकडे दुर्लक्ष केले जाते. दह्याचे फायदे जाणून घेतल्यावर नक्कीच तुम्ही दह्याला दुर्लक्षित करणार नाही.

दूध नापसंत असणाऱ्यांसाठी दही चांगला पर्याय : ज्यांना दूध पिणे आवडत नाही, त्यांना दही चांगला आणि आरोग्यवर्धक पर्याय ठरू शकतो. दह्यामुळे शरीरातील न्यूट्रिशनमध्ये वाढ होण्यास मदत होते, जे काम दूधदेखील करते.

पचनास मदतकारक : तुमची पचनशक्ती दह्यातील न्यूट्रियंट्स सहजपणे शोषून घेते. त्याचबरोबर तुम्ही खालेल्या इतर अन्नघटकांमधील न्यूट्रियंट्स शोषून घेण्यात दही मदत करते. ज्यायोगे जेवणाचे सहज पचन होण्यास मदत होते. दह्याच्या सेवनाने उदरात निर्माण होणारी दाहकता कमी होण्यास मदत होते. अशी दाहकता अति तिखट भोजनामुळे निर्माण होते.

निरोगी हृदय : हल्लीच्या तणावपूर्ण जीवनशैलीत हृदयविकाराची समस्या सर्वसाधारण झाली असताना, या समस्येस दूर ठेवण्यासाठी दही गुणकारी ठरते. उच्च रक्तदाबाचा धोका दह्यामुळे कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर कॉलेस्ट्रॉलची मात्रा कमी ठेवण्यास दह्याचे सेवन उपयुक्त ठरते.

त्वचेसाठी गुणकारी : दह्यात व्हिटॅमिन 'ई' आणि झिंक असल्याने याचा वापर घरगुती फेस पॅकच्या स्वरूपात त्वचेवर करता येऊ शकतो.

डँड्रफ : दह्यात लॅक्टिक ॲसिड असल्याने दह्यातील अँटी फंगल विशेषत्वे डँड्रफवर मात करण्यास मदत करतात.

वजन कमी करणे : सर्वात महत्त्वाचा फायदा. हल्ली अनेकजण वाढत्या वजनाच्या त्रासाने ग्रासलेले असतात. दह्यातील कॅल्शिअम शरीरातील कोर्टिसोलची मात्रा वाढू देत नाही. शरीरातील कोर्टिसोल हार्मोनल इंबॅलन्स, जाडेपणा आणि कॉलेस्ट्रॉलच्या वाढीचे कारण आहे.

दह्यामुळे प्रतिकारशक्तीत वाढ : दह्यात असलेले उत्तम प्रतीचे बॅक्टेरिया रोगांशी लढण्याची शक्ती वाढवतात. स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या व्हजायनल यीस्ट इन्फेक्शनपासून देखील बचाव करण्यास मदत करतात.

गुणकारी दही!



मधुमेहींसाठी 'ही' फळे ठरतील फायदेशीर !



आजकाल मधुमेह हा आजार अगदी सामान्य झालेला आहे. बदललेली जीवनशैली, अपुरी झोप, ताणतणाव, व्यायामाचा अभाव यासारख्या अनेक बदलांमुळे मधुमेह होण्याचे प्रमाण वाढत आहे. मधुमेह झाल्यानंतर खाण्यावर अनेक बंधन येतात. त्यातच मधुमेहींमध्ये अनेकदा काय खावं आणि काय खाऊ नये याविषयी समज-गैरसमज निर्माण होत असतात. त्यातच फळांमध्ये नैसर्गिक साखरेचं प्रमाण अधिक असतं या कारणामुळे अनेक मधुमेही फळांचं सेवन करण टाळतात. मात्र फळांमध्ये जरी साखरेचं प्रमाण असलं, तरी काही फळं ही अशी आहेत, जी मधुमेहींसाठी उपयुक्त ठरतात. चला तर जाणून घेऊयात कोणती आहेत ही फळं -

पीच : पीच या फळामध्ये १.६ ग्रॅम फायबरचं प्रमाण असतं. फायबरमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे पीच हे फळ मधुमेहींसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

संत्री : गोड, आंबट अशी चव असलेल्या संत्र्यांना मधुमेहींसाठी सुपरफूड मानलं जातं. संत्र्यामध्ये व्हिटॉमिन सी आणि फायबर्स असतात. त्यामुळे ब्लड ग्लुकोजचे प्रमाण कमी होते आणि इन्सुलिनचे प्रमाण वाढते.

किवी : किवीमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी सारखे अँटीऑक्सिडेंट्सचे प्रमाण भरपूर असते. त्यासोबतच किवीच्या सेवनामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहण्यास मदत होते.

सफरचंद : मधुमेहींसाठी आवश्यक असणारं फळ म्हणजे सफरचंद. यामध्ये सोल्युब आणि इंसोल्यूब हे दोन्ही फायबर्स भरपूर प्रमाणात असतात.

पेरू : पेरूमध्ये ग्यायसेमिक इंडेक्स कमी असून व्हिटॉमिन सी, फायबर्स आणि अँटीऑक्सिडेंट्स भरपूर प्रमाणात असतात.

हृदयरुग्णांसाठी राईस ब्रॅन ऑईल



भारतात भुईमूग, सोयाबीन, मोहरी आणि खोबरेल तेलाचे सेवन सर्वश्रुत आहे. या तेलांचे आरोग्याच्या दृष्टीने कमी-अधिक फायदे आहेत. आतापर्यंत खाद्यतेलाची निवड त्यांच्या किमतीवर केली जायची, परंतु हृदयरुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता खाद्यतेल निवडीबाबत ग्राहक आता चोखंदळ झाले आहेत. नवीन संशोधनानुसार सर्वाधिक निरोगी आणि हृदयाच्या आरोग्याला उपयुक्त खाद्यतेल म्हणून राइस ब्रॅन ऑईल ओळखले जाते. हे तेल भाताच्या कोंड्यापासून तयार केले जाते. अमेरिकेत तसेच अनेक आशियाई देशांमध्ये निरोगी तेल म्हणून राईस ब्रॅन विकले जाते. कोलेस्टेरॉलची पातळी योग्य तितकी राखण्यासाठी आणि हृदयविकार व अन्य आजार रोखण्यासाठी या खाद्यतेलाचा वापर जागतिक आरोग्य संघटनेनेही सुचवला आहे. आरोग्यविषयक वाढत्या जागरुकतेमुळे लोक ऑलिव्ह ऑईल आणि कॅनोला तेलाला पसंती देताना दिसतात. परंतु या महागड्या आणि आयात होणाऱ्या ऑलिव्ह आणि कॅनोला ऑईलला किफायतशीर भारतीय पर्याय म्हणून राईस ब्रॅन ऑईल हळूहळू लोकांच्या पसंतीस उतरत आहे. भाताच्या उत्पादनात जगात चीनपाठोपाठ भारत हा दुसरा मोठा देश असला तरी सध्या सुमार १० लाख टन इतकेच राईस ब्रॅन तेल उत्पादित होते तर भारतातील वार्षिक खाद्यतेलाचा उपभोग हा एक कोटी २० लाख टन असून त्या तुलनेत उत्पादित राईस ब्रॅन तेलाचे प्रमाण जेमतेम पाच टक्के आहे. भारतात भाताच्या कोंड्याची प्रचंड उपलब्धता असली तरी हा भात कोंडा वीट भट्ट्यांमध्ये जळणासाठी आणि पशुखाद्य म्हणूनच वाया घालवला जातो. सध्या देशात अदानी विल्मर, मॅरिको, राईसेला यासह विविध नऊ उत्पादकांचे राईस ब्रॅन तेलाचे ब्रँड्स उपलब्ध आहेत. हे तेल आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेच, पण त्यासोबत स्वयंपाकाच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे. कारण २१७ अंश सेल्सियस तापमानापर्यंत तापलेल्या राईस ब्रॅन तेलात नैसर्गिक पोषणमूल्ये आणि अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अबाधित राहते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ०७ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०२५

संपादकीय

विकासकांच्या मागण्यांपुढे लाभार्थी हतबल



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



गृहनिर्माण योजनेत घरे घेणाऱ्या लाभार्थ्यांना विकासकांच्या मनमानीपुढे झुकावे लागले आहे. कायदा गोरगरीबांसाठी तयार करण्यात आला असला, तरी विकासक मोकाटपणे गोरगरीबांचा छळ करत आहेत; मनमानीपणे गोरगरीबांचे आर्थिक शोषण करीत आहेत.

म्हाडामार्फत वितरित करण्यात येत असलेल्या २० टक्के गृहनिर्माण योजनेचा बोजवारा उडाला आहे. म्हाडा लाभार्थ्यांची यादी अंतिम करून विकासकास देते; मात्र या योजनेत घरे घेणारे लाभार्थी विकासकांच्या अवास्तव मागण्यांपुढे हतबल झाले आहेत. विकासकांच्या मनमानीपणामुळे अनेकांना हक्काचे घर गमवावे लागले आहे. विकासकांकडून होणाऱ्या पिळवणुकीबाबत शासन दरबारी दाद मागितल्यानंतरही न्याय मिळत नसल्याने गोरगरीब नागरिक प्रशासनाकडून बेदखल झाले आहेत.

एकात्मिक सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) मधील कलम ३.८.२ अंतर्गत सर्वसमावेशक गृहनिर्माणमधील तरतुदीनुसार १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका हद्दीतील चार हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रस्तावांकरिता विकासक एकूण क्षेत्राच्या २० टक्के क्षेत्राएवढे अत्यल्प उत्पन्न गट आणि अल्प उत्पन्न गटासाठी घरे बांधतात. ही घरे म्हाडा प्राधिकरणास विकासकाकडून प्राप्त होतात. बांधकाम परवानगीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत म्हाडाकडून लाभार्थ्यांची यादी अंतिम करून विकासकास देणे आवश्यक आहे. त्यासाठी म्हाडा लॉटरी काढून लाभार्थ्यांची नावे विकासकाला कळवले.

या यादीतील लाभार्थ्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या वर्षातील बांधकाम दराचा रेडीरेकनर दर अधिक २५ टक्के रक्कम घेऊन विकासकामार्फत सदनिकांचे वितरण करण्यात येते. यामध्ये २५ टक्क्यापैकी केवळ १ टक्का प्रशासकीय खर्चापोटी म्हाडास प्राप्त होतो. सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेमध्ये म्हाडाचे काम हे सदनिकांची किंमत निश्चित करून विकासकास लाभार्थ्यांची नावे उपलब्ध करून देणे एवढ्यापुरते मर्यादित आहे. यामध्ये संपूर्ण आर्थिक व्यवहार हा विकासक व लाभार्थी या दोघांमध्येच होतो. याचाच फायदा विकासक घेऊ लागले आहेत.

लॉटरी काढून दिल्यानंतर विकासक लाभार्थ्यांकडून घराची वाढीव किंमत आकारतात. विकासक लाभार्थ्यांकडून म्हाडामार्फत देण्यात येणाऱ्या देकार पत्रामध्ये नमूद सदनिकेच्या विक्री किमती व्यतिरिक्त इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, ॲमिनिटी चार्जेस, डेव्हलपमेंट चार्जेस, लिगल चार्जेस, इत्यादीच्या नावाखाली अतिरिक्त रकमेची मागणी करतात. यामुळे सदनिकेची किंमत ही अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटांमधील नागरिकांच्या आवाक्याबाहेर जाते. त्यामुळे लाभार्थ्यांना नाइलाजाने सदनिकांचा हक्क सोडावा लागतो. अशा सदनिका विकासक खुल्या बाजारात विकतात. तसेच या योजनेंतर्गत विकासक २० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफएसआय) लाभ घेतात. यामुळे विकासकाचा दुहेरी फायदा होतो.

त्यामुळे म्हाडा प्राधिकरणाचे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकाऱ्यांनी १८ जुलै २०२५ रोजी २० टक्के योजनेतील विकासकांची मनमानी रोखण्यासाठी परिपत्रक जारी केले. त्यानुसार देकार पत्रामध्ये नमूद केलेल्या विक्री किमतीवरच विकासकाने लाभार्थ्यांसोबत करारनामा करावा. त्यामध्ये मुद्रांक शुल्क, पंजीकरण शुल्क, वस्तू व सेवा कर, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी लागणारे शासन शुल्क, विद्युत जोडणीसाठी लागणारे शासन शुल्क, याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, ॲमिनिटी चार्जेस, डेव्हलपमेंट चार्जेस, लिगल चार्जेस, इत्यादीसाठी अतिरिक्त शुल्काची कोणत्याही लाभार्थ्यांकडून मागणी करू नये, अशा सूचना संबंधित म्हाडाच्या विभागांना देण्यात आल्या होत्या; मात्र मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकाऱ्यांना प्रशासकीय निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचे म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी नुकतेच एका कार्यक्रमात सांगितले. यामुळे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकामुळे सुखावलेल्या नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे.

म्हाडा प्राधिकरणाने २० टक्के योजनेबाबत गृहनिर्माण विभागाकडे पत्रव्यवहार केला असल्याने यामधून गोरगरीब लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. म्हाडाच्या कोकण मंडळामार्फत काढण्यात आलेल्या गेल्या काही लॉटऱ्यांमध्ये २० टक्के योजनेंतर्गत अनेक विकासकांच्या घरांचा समावेश होता. ठाण्यातील एका नामांकित विकासकांच्या प्रकल्पात लॉटरीमध्ये यशस्वी झालेले अर्जदार देकारपत्र घेऊन विकासकांकडे गेले. तेव्हा विकासकांनी लाभार्थ्यांकडे घराची अतिरिक्त किंमत भरण्याची सूचना केली. म्हाडा अधिकाऱ्यांनी यामध्ये तक्रारदार लाभार्थ्यांचे म्हणणे समजून घेत विकासकाला शुल्क न आकारण्याच्या सूचना देण्यात आल्या; मात्र विकासकाने ना म्हाडाचे ऐकले ना तत्कालीन मुख्यमंत्री कार्यालयाचे आदेश पाळले. विकासकाच्या शुल्कवाढीस विरोध करणाऱ्या लाभार्थ्यांना अखेरपर्यंत घराचा ताबा घेण्यासाठी झगडावे लागले.

कोकण, पुणे मंडळात २० टक्के योजनेत विकासकांकडून लाभार्थ्यांचा हक्क हिसकावण्यात आले. याबाबत कुठेही दाद मागितली, तरी लाभार्थ्यांना विकासकांच्या मनमानीपुढे झुकावे लागले आहे. कायदा गोरगरीबांसाठी तयार करण्यात आला असला तरी विकासक मोकटपणे गोरगरीबांचा छळ करत आहे. यामध्ये म्हाडाची मंडळे आमचे काम लॉटरी काढून देण्यापुरते असल्याचे सांगून हात झटकत आहेत. त्यामुळे गोरगरीब अर्जदारांना कोणीच वाली नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. विकासक मनमानीपणे गोरगरीबांचे आर्थिक शोषण करत असताना शासकीय यंत्रणा योजनांचे गोडवे गाण्यात आणि भविष्यात लाखो घरे निर्माण करण्याच्या केवळ वलग्ना करण्यात व्यस्त आहे.

समावेशक गृहनिर्माण योजनेतून सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (अत्यल्प उत्पन्न गट) आणि अल्प उत्पन्न गट (एलआयजी) करिता ३५ लाख घरे बांधण्याचे लक्ष्य राज्य सरकारने ठेवले आहे. याकरिता ७० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच त्यापुढील १० वर्षांत ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्टही सरकारचे आहे. मात्र विकासकांच्या लुटीला लगाम कोण घालणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

अनेक विकासकांनी २० टक्के योजनेतील घरे लाटली. काही विकासकांनी लाभार्थ्यांकडून म्हाडाने निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त अधिकचे शुल्क वसूल केले, तर प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र मिळून दोन वर्षांहून अधिक कालावधी झाल्यानंतरही विकासक लाभार्थ्यांकडून जीएसटी शुल्क वसूल करत असल्याची अनेक प्रकरणे म्हाडाकडे प्रलंबित आहेत. म्हाडा केवळ लॉटरी काढण्याची जबाबदारी पूर्ण करते. मात्र मनमानीपणे गोरगरीब लाभार्थ्यांची लूट करणाऱ्या मोकाट विकासकांच्या मुसक्या कोण आवळणार हा खरा प्रश्न आहे. २० टक्के योजनेतील घरे वाळीत टाकल्याप्रमाणे विकासक उभारत आहेत आणि या योजनेचा लाभ घेऊन आपला प्रकल्प वेगळा उभारून विकासक असमानता निर्माण करत आहेत. अशा विविध प्रश्नांच्या गुंत्यामध्ये ही योजना अडकली आहे. गोरगरीबांना परवडणाऱ्या किमतीमध्ये घर मिळवून देण्यासाठी ही कायद्यातील तरतूद आहे की, विकासकांची झोळी भरण्यासाठी आहे? याचा एकदा प्रशासनाने विचार करण्याची वेळ आली आहे.

अर्थव्यवस्थेची दमदार वाटचाल आणि स्वदेशीचा जागर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत असून, जीएसटी दर कपातीसह 'स्वदेशीचा जागर' देशभर गाजतो आहे. ट्रम्प प्रशासनाच्या दबावाला ठामपणे उत्तर देत मोदी सरकारने कर कपात, स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचा ध्यास घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात वस्तू आणि सेवाकराच्या (जीएसटी) दरामध्ये मोठी कपात होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार जीएसटी दरांमधील कपात २२ सप्टेंबरपासून लागू झाली आहे. याच दरम्यान, 'गर्व से कहो ये स्वदेशी है' हे अभियानही देशभर मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील वाढलेल्या आयात शुल्क, एच-१ बी व्हिसा शुल्कातील वाढ अशा निर्णयातून मोदी सरकारवर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर जीएसटी दर कपातीचा निर्णय अंमलात आला. दर कपातीच्या या निर्णयाला पूरक असा स्वदेशीचा जागरही सुरू झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था मृत झाल्याचे वक्तव्य करून आपली मानसिकता दाखवून दिली होती. भारतीय कृषी क्षेत्र अमेरिकेच्या शेतमालासाठी पूर्णपणे खुले करण्याची मागणी ट्रम्प प्रशासनाकडून करण्यात आली होती. ही मागणी शांतपणे फेटाळून लावत मोदी सरकारने ट्रम्प प्रशासनाच्या दबावतंत्राला कोणत्याही परिस्थितीत भीक घातली जाणार नाही, असे स्पष्ट केले. ट्रम्प प्रशासनाने भारताबद्दल अवमानजनक भाषा वापरूनही त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने ठाम कृतीने उत्तर दिले. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क दुप्पट केल्यामुळे भारताच्या निर्यातीवर मोठा परिणाम होणार, अशी भीती देशातील अनेक स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी दाखविली होती. अमेरिकेचे दबावतंत्र एकीकडे कठोर होत असताना मोदी सरकारने वस्तू आणि सेवाकरात मोठा फेरबदल केला. वस्तू आणि सेवाकराचे पाच आणि १८ टक्के असे दोनच टप्पे राहतील, असे जाहीर करत मोदी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील क्रांतिकारी ठरणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली. कार, दुचाक्या, ट्रॅक्टर, टिलरसारखी शेतीची अवजारे, खते यांसारख्या वस्तूंवरील जीएसटीवर मोठी कपात केल्यामुळे सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जीएसटीमध्ये मोठी कपात केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. आज देश जीएसटी बचत उत्सव साजरा करत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आम्ही इथेच थांबणार नाही, असे म्हणत मोदी यांनी भविष्यात वस्तू व सेवा करात आणखी कपात होण्याचेही संकेत दिले आहेत. जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी चारचाकीच्या बाजारात विक्रीच्या नवनव्या विक्रमांची नोंद झाली. मारुती सुझुकीच्या ३० हजार गाड्या २२ सप्टेंबर रोजी विकल्या गेल्या. ह्युंदाईच्या ११ हजार, तर टाटा मोटर्सच्या १० हजार गाड्यांची विक्री एकाच दिवसात झाली.

जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाली असतानाच दुसरीकडे भारतात बनवलेल्या आयफोन-१७ची विक्री १९ सप्टेंबर रोजी सुरू झाली. हा फोन खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे दृश्य मुंबईसह अनेक शहरांमध्ये दिसले. ज्या अर्थव्यवस्थेची ट्रम्प प्रशासनाने हेटाळणी केली त्याच भारतात आयफोन-१७ सारख्या महागड्या फोनची खरेदी करण्यासाठी रांगा लागत आहेत. हे चित्र कार आणि महागड्या मोबाईलच्या विक्रीपुरते मर्यादित नाही. यातून भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाढत्या खरेदी शक्तीचे आणि दमदार अर्थव्यवस्थेचे दर्शन संपूर्ण जगाला घडले. मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या निधारिने ह्यहर घर स्वदेशी, घर घर स्वदेशीह्ण या अभियानाचा जागर सुरू केला आहे. भारतीय नागरिकांनी भारतात बनवलेल्या वस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने करीत आहेत. भारतीय उत्पादकांनी, कारागिरांनी बनविलेल्या वस्तू खरेदी केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळेल. विदेशात बनविलेल्या अनेक वस्तू, उत्पादने सर्वसामान्य भारतीयांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातील उत्पादकांनी, स्थानिक कारागिरांनी बनविलेल्या वस्तू आग्रहाने वापरणे सुरू केल्यास देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढू शकेल. मोदी सरकारने याच उद्देशाने गेल्या ११ वर्षांत देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर दिला आहे. महात्मा गांधींनी पुरस्कार केलेली खादी काँग्रेसच्या अनेक वर्षांच्या सत्ताकाळात दुर्लक्षित राहिली होती. मोदी सरकारने वेगवेगळ्या मागार्ने खादीची विक्री वाढावी यासाठी निधारिने प्रयत्न केले. या प्रयत्नांना चांगले यश मिळाल्याचे दिसून येत आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योगाने एक लाख ७० हजार कोटी एवढा विक्रमी व्यवसाय केला. खादी कपड्यांची तडाखेबंद विक्री होत आहे. लघु आणि कुटीर उद्योगावर मोदी सरकारचा विशेष भर आहे. आत्मनिर्भर भारताचे आणि विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशातील लघु आणि कुटीर उद्योगाला महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागणार आहे, या दृष्टीने मोदी सरकारने धोरणांची आखणी केली आहे. दूरदृष्टीने घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या काळात संरक्षण उत्पादनांची निर्यात होऊ लागली आहे. सेमी कंडक्टर चीपसाठी अन्य देशांवर अवलंबून असलेला भारत आता या चीपची निर्मिती करणार आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत १० सेमीकंडक्टर कारखान्यांना मंजुरी देण्यात आली आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीच्या निर्णयांना यश मिळत आहे, हे भारताच्या विकास दरावरून ठळकपणे अधोरेखित होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) २०२५-२०२६ या वर्षात भारताचा विकासदर ६.४ ते ६.५ टक्के एवढा राहील, असे अनुमान वर्तवले आहे. २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत भारताचा विकासदर ७.८ टक्के होता. जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. शेजारी देशांमधील यादवी, सत्तापालट, रशिया-युक्रेन युद्ध, ट्रम्प प्रशासनाने सुरू केलेले दबावतंत्र अशा पटावर भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत आहे. या वाटचालीला अपशकून करण्याचे प्रयत्न सातत्याने होत असतानाही भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या दिमाखाने जगातील तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती डी आचोळे, नालासोपारा (पु)

दुरध्वनी क्रं. ७२१९३७०००६ / ७२१९३७०००९

जावक क्र. वविशम /कवि/३०११/२०२५-२०२६
दिनांक - ०३/१०/२०२५

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	आचोळे -०६	२५४/१३	१२८२५	रोहीदास राजाराम कदम	वासंती वसंत शेलार
२	आचोळे -०६	२५४/२९	१२७९६	श्री. साईनाथ डेव्हलपर्स	भाऊ रामचंद्र लाड
३	आचोळे -०६	३१४/६१	१२८०२	महेश तुकाराम खांडेकर	रमेश श्रीधर दावडे
४	आचोळे -०१	३१/४८	१२८३७	बिस्मील्ला वफीयोदीन नागालीया	मोहम्मद कमिल हकीमुद्दीन अन्सारी
५	माणिकपूर -२/२	AC२०/३६२०४	१२८०५	एस मुरलीधरन	वेरिना जेन मेंडोन्सा
६	माणिकपूर -२/३	AC२१/३८०७९	१२८२८	आनंद गोकर्ण	संजयकुमार बालाभाई पटेल व हीनाबेन संजयकुमार पटेल
७	आचोळे -९/२	८०८/३६	१२७८८	मे शार्प रियल्टर्स	रितेश राजेश कदम
८	आचोळे -९/२	६६३/७२	१२५८०	ॲन्ड्री मॉरिरो धमानिया	रविशंकर नवरंगलाल शर्मा व अंजु उदाराम ओझा
९	आचोळे -०९	४३५/१०	१२८००	रमेशकुमार सोनेलाल ठाकुर	अंबिका रमेशकुमार ठाकुर व लक्ष्मी रमेशकुमार ठाकुर
१०	आचोळे -०९	६१८/१९	१२८३२	शिला ज जयस्वाल	रोहिता अजय अदमन्या
११	आचोळे -०८	११७/१२	१२८६७	राम आशीष शाहू	सुवर्णा भिकू रक्ते
१२	आचोळे -०८	६८/२७	१२८६८	जयप्रकाश रमणीकलाल पटणी	सदानंद हरिभाऊ गायकवाड व रेश्मा सदानंद गायकवाड
१३	आचोळे -०२	१७८/२१	१३२५८	गिरजा देवीलाल त्रिवेदी	बुलकुमार प्रकाश गंतायत
१४	आचोळे -०३	१/३४	१३२८७	दिवानजी जयंती मेहता / नेहा डेव्हलपर्स	कृष्णा रामू नाकमन
१५	आचोळे -०३	११५/८	१३२१६	विलास पाटील	विधी विनोद श्रृंगारे
१६	आचोळे -०३	११५/११	१३२११	मनोज शर्मा	रवि वर्मा
१७	आचोळे -९/१	६०७/८	१३२१७	मनिषा सुचित पवार	निकिता नितीन नेमन
१८	आचोळे -९/१	५२४/२०	१३२०६	आश्विनी सुर्यकांत पडोळे	हरिशंकर यादव
१९	आचोळे -९/२	६७१/१८८	१३२१८	बिपिन रमनलाल पंचाल व नेहा बिपिन पंचाल	जयप्रकाश चंद्रशेखर राय व हर्षिता जयप्रकाश राय
२०	आचोळे -०५	१३०/३६	१३२७५	फलिमा शब्बीर सदरीवाला	मुरतजा टेलर व फतिमा मुरतजा टेलर

सही /-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'डी', आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ०७ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०२५

आयात-निर्यात व्यवहारांसाठी आता डिजिटल बॉन्ड

कागदी स्टॅम्प पेपरला 'गुडबाय'... महसूल मंत्री बावनकुळेंचा महत्त्वाकांक्षी निर्णय

मुंबई। महाराष्ट्रातील व्यापार व उद्योग जगताला मोठा दिलासा देत राज्य सरकारने आयात-निर्यात व्यवसायातील पारंपरिक कागदी बॉन्ड बंद करून त्याऐवजी 'ई-बॉन्ड' प्रणाली सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा दुवा ठरणारे हे पाऊल असून, व्यवहार सुलभ करणाऱ्या प्रक्रियेला गती देईल, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ई-बॉन्ड सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील सोळावे राज्य असून, आयात निर्यात व्यवहारासाठी वापरण्यात येत असलेले कागदी स्वरूपातील स्टॅम्प पेपर आजपासून बंद झाल्याचेही ते म्हणाले.सध्या



आयात-निर्यात व्यवसायांसाठी दर महिन्याला सुमारे तीन ते चार हजार बॉन्ड काढले जातात, ज्यामुळे वर्षाकाठी चाळीस हजारांहून अधिक बॉन्ड स्वीकारले जातात. या सर्व मोठ्या व्यवहारात आता ई- बॉन्डमुळे क्रांती होणार आहे. ही प्रक्रिया प्रथमदर्शनी लहान वाटत असली तरी, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरेल, असेही ते म्हणाले.ई-बॉन्ड पद्धती कशी असेल आणि तिचा राज्याच्या अर्थकारणाला कसा लाभ होईल, याचे सादरीकरण नोंदणी व मुद्रांक महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी मंत्रालयात झालेल्या उद्घाटन कार्यक्रमात केले. यावेळी अर्थ राज्यमंत्री आशीष जैस्वाल, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, न्हावाशेवा बंदराचे आयुक्त विजय ऋषी आदी उपस्थित होते.

असे होणार ई-बॉन्डचे फायदे!

आयात-निर्यात करणाऱ्या व्यावसायिकांना आता महाराष्ट्रातील सर्व कस्टम कार्यालयांमधून ई-बॉन्ड सहजपणे उपलब्ध होतील. बॉन्ड मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि वेगवान होणार आहे.

कागद आणि पर्यावरणाचे रक्षण!

आजपर्यंत वापरले जाणारे पाचशे रुपयांचे कागदी स्टॅम्प पेपर आता बंद होतील. त्यांच्या जागी डिजिटल बॉन्ड उपयोगात येणार असल्याने मोठ्या प्रमाणात कागदांची बचत होईल, ज्यामुळे पर्यावरणाचेही रक्षण होईल.

आर्थिक व्यवहारात पारदर्शकता!

ई-बॉन्डमुळे व्यवहारात सुलभता येण्यासोबतच पारदर्शकता वाढेल, तसेच महसुलाची गळती थांबण्यास मदत होऊन सरकारी तिजोरीत भर पडेल. राज्य सरकारने डिजिटल माध्यमांचा वापर करून प्रशासनात आधुनिकता आणण्याचा घेतलेला हा निर्णय, महाराष्ट्राला व्यापार सुलभतेच्या निदेशांकात अधिक वरच्या स्थानी घेऊन जाण्यास निश्चितच मदत करेल.

सहकारी संस्थांची निवडणूक लांबणीवर

अतिवृष्टीमुळे ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत



मुंबई। राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता ३१ ऑक्टोबरपर्यंत सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यात गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीचा फटका राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांना बसला आहे.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते. महसूल व वन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार राज्यातील बहुतांश भागात अतिवृष्टीमुळे जनजीवन तसेच वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. राज्यातील ३२ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या १०० टक्क्यांपेक्षा जास्त पर्जन्यमान झालेले असून त्यापैकी १२ जिल्ह्यांत सरासरीच्या २०० टक्क्यांपेक्षा जास्त व इतर ९ जिल्ह्यांत १५० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

अशा जिल्ह्यांतील वाहतूक व्यवस्था व जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. ही परिस्थिती पूर्वपदावर येण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामुळे सद्यः परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पाडणे शक्य होणार नाही. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

'लाडक्या बहिणीं'साठी वडील, पतीचे 'आधार' सक्तीचे

मुंबई। राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजनेत नवा नियम लागू केला आहे. यानुसार 'ई-केवायसी' प्रक्रियेदरम्यान महिला लाभार्थ्यांना वडील किंवा पतीच्या 'आधार'चा तपशील देणे बंधनकारक करण्यात आले आहे. अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न तपासण्यासाठी आणि प्रत्यक्ष पात्र महिलांनाच लाभ मिळावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

या योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार आढळल्याने सरकारने हे पाऊल उचलले आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत ही योजना जाहीर केली होती. मात्र काटेकोर तपासणीत तब्बल २६.३४ लाख बनावट लाभार्थी समोर आले. धक्कादायक बाब म्हणजे अनेक पुरुष तसेच सरकारी कर्मचाऱ्यांनीही या योजनेत हात धुवून घेतले.

सत्ताधारी आघाडीच्या मतपेटीला भक्कम बनवणाऱ्या या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर प्रचंड आर्थिक भार पडला आहे. निवडणुकीच्या काळात पात्रतेचे निकष नीट



पाहिले गेले नव्हते, मात्र आता सरकारने अपात्र लाभार्थी बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम सुरू केली आहे. कठोर नियमांची अंमलबजावणी सुरू झाली असून लाखो अपात्रांना योजनेतून वगळले जात आहे.

नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, केवळ महिलेचेच नव्हे, तर तिच्या वडिलांचे किंवा पतीचे उत्पन्नही तपासले जाणार आहे. विवाहित महिलांसाठी पतीचे वार्षिक उत्पन्न तपासले जाईल, तर अविवाहित महिलांच्या बाबतीत वडिलांचे उत्पन्न पाहिले जाईल. या योजनेतील मुख्य अट म्हणजे संपूर्ण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. यापेक्षा अधिक उत्पन्न असल्यास लाभार्थी अपात्र ठरणार आहेत.

पूर्वी सरकार फक्त महिला अर्जदाराचे उत्पन्न पाहत होते. परिणामी गृहिणी किंवा फारसे वैयक्तिक उत्पन्न नसलेल्या महिला आपोआप पात्र ठरत होत्या. मात्र अधिकाऱ्यांच्या तपासात आढळले की, महिलांचे स्वतःचे उत्पन्न कमी किंवा शून्य असले, तरी त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न पात्रतेच्या मर्यादेपेक्षा बरेच जास्त होते. त्यामुळेच नव्या नियमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

महिला व बालविकास विभागातील एका अधिकाऱ्याने म्हटले, ''यात चूक काय आहे? सरकारला खऱ्या अर्थाने ज्यांना मदत हवी आहे, त्यांच्यापर्यंतच पैसा पोहोचवायचा आहे. कुटुंबाचे उत्पन्न न पाहता एखाद्या महिलेची खरी आर्थिक स्थिती कशी कळणार? आधार पॅन व बँक खात्यांशी जोडलेला असल्याने सरकारला उत्पन्न तपासणे सोपे जाते.''

शाळा सुरक्षिततेचा अहवाल जाहीर करा... उच्च न्यायालयाची सरकारला ९ ऑक्टोबरपर्यंत मुदत

मुंबई। बदलापूरमधील शाळेत दोन अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचारानंतर तयार करण्यात आलेल्या बालसुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन राज्यातील शाळांमध्ये झाले आहे की नाही, यासंदर्भातील माहिती ९ ऑक्टोबरपर्यंत सार्वजनिक करावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी महाराष्ट्र सरकारला दिले आहेत.

न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि संदीश पाटील यांच्या खंडपीठाने सांगितले की, शाळांकडून जबाबदारीने अंमलबजावणी होण्याकरिता पारदर्शकता आवश्यक आहे.

सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी न्यायालयाला सांगितले की, सुमारे ४०%



शाळांनी राज्याच्या वेबसाइटवर पालनासंबंधी माहिती अपलोड केली आहे.

उर्वरित शाळांकडून माहिती गोळा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्य सरकारने २४ व २५ सप्टेंबर रोजी संबंधित आदेश जारी केल्यानंतर शाळांनी माहिती अपलोड करणे सुरू केले.

तथापि, ॲड. रेबेका गोंसाल्व्हिस, ज्यांची अमायिकस क्यूरी (न्यायालयीन सल्लागार) म्हणून नियुक्ती झाली आहे, यांनी सांगितले की, सरकारी वेबसाइट अजूनही सार्वजनिक उपयोगासाठी खुली नाही.

न्यायालयाने हेही विचारले की, वेबसाइट रिअल टाइममध्ये अपडेट होण्यास सक्षम आहे का, जेणेकरून पालकांनी एखाद्या शाळेचे नाव क्लिक केल्यावर त्या शाळेचे पालनाचे तपशील व कारवाईचा कालावधी दिसावा.

गमतीशीर बाब म्हणजे, जेव्हा न्यायालयाने शिक्षण विभागाच्या वेबसाइटबाबत विचारले, तेव्हा एका अधिकाऱ्याने कबूल केले की, त्यांनी स्वतः अजून ती वेबसाइट पाहिलेलीच नाही.

न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी प्रकरण १० ऑक्टोबरपर्यंत तहकूब ठेवले आहे. ९ ऑक्टोबरपर्यंत सर्व माहिती सार्वजनिक करणे सरकारने सुनिश्चित करावे, असा स्पष्ट आदेश दिला आहे.

> ''माहिती सार्वजनिक केली तर पालक स्वतः देखरेख करू शकतील. ४०% माहिती अपलोड झाली असेल तरी ती पालकांसाठी खुली असली पाहिजे. त्यामुळे शाळांवर दबाव निर्माण होईल. पालक त्याचा पाठपुरावा करू शकतील.''
>
> -मुंबई उच्च न्यायालय

पुणे जिल्हा परिषदेची शाळा जगात अव्वल



मुंबई। भारतीय शाळा जगात सर्वोत्कृष्ट ठरणे हे जागतिक पातळीवर भारतीय शिक्षण पद्धतीला जगमान्यता मिळण्यासारखे आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेचे जगात सर्वोत्कृष्ट ठरणे हा क्षण देश आणि राज्याच्या शासकीय शिक्षण व्यवस्थेसाठी कलाटणी देणारा क्षण आहे, असे गौरवोद्गार शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काढले.

इंग्लंड येथे मुख्यालय असणाऱ्या जागतिक संस्थेने आयोजित केलेल्या 'वर्ल्ड बेस्ट स्कूल कॉम्पिटिशन' स्पर्धेमध्ये जगभरातील समुदायाने पसंती क्रमानुसार केलेल्या मतदानानुसार पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील जालिंदरनगर येथील जिल्हा परिषद शाळा सर्वाधिक मते मिळवून 'कम्युनिटी चॉइस अवॉर्ड' या मानाच्या विभागात सर्वोत्कृष्ट ठरली.

लोकसहभागातून विकसित जिल्हा परिषदेची ही शाळा आहे. या शाळेला एक कोटी रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री दादाजी भुसे यांनी बुधवारी मालेगाव येथे पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

गैरहजर आगार प्रमुखांवर कारवाई!

बेजबाबदार वर्तनाबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

मुंबई। राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. जीवितहानी झाली असून शेतपिकाचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आगार प्रमुखांनी उपस्थित रहाणे बंधनकारक असताना २५१ पैकी ३४ आगारातील आगार प्रमुख कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये निष्पन्न झाले आहे. ही गंभीर बाब असून बेजबाबदार वर्तन करून कर्तव्यात हलगर्जीपणा दाखवणाऱ्या आगारप्रमुखांवर तातडीने कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन भविष्यात खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत, पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली आहे.



अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले आहेत. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात हजर राहून आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडण्याऐवजी काही आगार प्रमुख कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे. अशाप्रकारे आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगारप्रमुखांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस तातडीने बजावली पाहिजे. त्यामध्ये त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर प्रमादीय कारवाई करण्यात येईल.

हे आगारप्रमुख ज्या विभाग नियंत्रकांच्या अखत्यारित काम करतात त्या विभाग नियंत्रकांनादेखील विचारणा केली जाणार आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले. आगारप्रमुख हा एसटी प्रशासनाचा मुख्य घटक आहे. त्याच्या हाताखाली शेकडो कर्मचारी काम करत असतात. तो ज्या आगारात कार्यरत असतो, तेथे अनेक बसेस रात्रपाळीला मुक्कामी असतात. तसेच लाखो रुपये किमतीचे ऑइल, इंधन व इतर सुटे भाग तिथे असतात. याबरोबरच तिकीट विक्रीमधून आलेली मोठी रक्कम देखील आगारात ठेवण्यात आलेली असते. अशा परिस्थितीमध्ये एक पालक म्हणून आगारप्रमुखांवर मोठी जबाबदारी असते. त्याने आगारात दररोज उपस्थित राहून या सर्वांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे असते. परंतु काही आगारप्रमुख हे आपल्या आगारात उपस्थित नसल्याचे सुरक्षा व दक्षता खात्याच्या गोपनीय अहवालात स्पष्ट झाले होते. कर्तव्यात कसूर करून बेजबाबदार वर्तन करणाऱ्या अशा आगारप्रमुखांवर प्रशासन लवकरच कारवाई करेल. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत अशी दक्षता एसटी प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहेत.

एसटी भाडेवाढ अखेर रद्द...

पूरपरिस्थितीमुळे सरकारचा निर्णय

मुंबई। राज्यातील पूरपरिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने केलेली १० टक्के बस भाडे दरवाढ रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री यांना दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

एसटी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात दहा टक्के भाडेवाढ करीत असते. यातून साधारणपणे महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. मात्र यंदा राज्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती लक्षात घेऊन अपवाद म्हणून महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे यावेळी एकनाथ शिंदे यांनी सांगितले. दिवाळी सणासाठी एसटी बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या लाखोंच्या



घरात आहे. सध्या खासगी वाहने वाढली असली तरीही एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास मानला जातो. अनेक प्रवासी एसटीनेच प्रवास करतात.

उपमुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश

दिवाळीत एसटीच्या तिकिट दरात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला होता. मात्र ऐन दिवाळीत एसटीच्या प्रवाशांना भुर्दंड सोसावा लागू नये यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परिवहन मंत्र्यांना भाडेवाढ रद्द करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार एसटीची १० टक्के भाडेवाढ रद्द करण्यात आल्याने लाखो प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

अनधिकृत इमारतीधारकांना पालिकेचा दिलासा... पुनर्वसनाच्या तरतूदीशिवाय नवीन बांधकाम नाही

ठाणे। मागील काही महिन्यांपासून महापालिकेमार्फत ठाणे महापालिका हद्दीतील अनधिकृत इमारतींवर कारवाई सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिका जागी झाली असली तरी येथे घर घेणारे सर्वसामान्य नागरिक मात्र बेघर झाले आहेत. याशिवाय या कारवाईचा खर्च महापालिका संबंधित जमीन मालकांकडून वसूल करणार असून तो खर्च सातबाऱ्यावर बोजा म्हणून नोंदवला जाणार आहे.

महापालिकेने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, जमीन मालक किंवा विकासकांनी बेघर रहिवाशांना मोबदला अथवा पुनर्वसनाची तरतूद केली नाही, तर पाडकाम झालेल्या जागेवर नवीन इमारत उभारणीस परवानगी देण्यात येणार नाही. यामुळे बेघर झालेल्या रहिवाशांना न्याय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ठाणे महापालिका हद्दीत कळवा, मुंब्रा, दिवा, घोडबंदर आदींसह शहराच्या इतर भागात मागील काही वर्षांत अनधिकृत इमारतींचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर



वाढले आहे. या बांधकामांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असून, सुनावणीदरम्यान न्यायालयाने ती पाडण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महापालिकेकडून पाडकामाची कारवाई सुरू आहे. या अनधिकृत इमारतीतील सदनिका नागरिक जमीनमालक किंवा विकासकांकडून खरेदी करतात. मात्र पाडकामानंतर हे नागरिक बेघर होतात. खासगी जमिनींवरील अनधिकृत बांधकामे अनेकदा जमीन मालकांच्या संमतीने उभारली जातात. मुंबई महानगरातही अशीच परिस्थिती आहे. राज्य शासनाने यासाठी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. त्याआधारे ठाणे महापालिकेने आता बेघरांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्या निर्णयानुसार, जमीनमालक किंवा विकासकांनी मोबदला अथवा पुनर्वसनाची तरतूद केल्याशिवाय संबंधित जागेवर नवीन इमारत उभारणीला परवानगी दिली जाणार नाही. शिवाय पाडकामाचा खर्च जमीनमालकांकडून वसूल केला जाईल आणि तो सातबाऱ्यावर नोंदवला जाईल. खर्च जमा न झाल्यास कोणत्याही विकासकामाला परवानगी मिळणार नाही.

महापालिका जमा करतेय पुरावे

महापालिकेकडून सांगण्यात आले की, खासगी जागेवरील अनधिकृत इमारती पाडल्यानंतर बेघर झालेल्या रहिवाशांनी आपले घर खरेदीचे पुरावे करारनामा, ॲग्रीमेंट किंवा इतर कागदपत्रे संबंधित प्रभाग समितीअंतर्गत सहाय्यक आयुक्तांकडे जमा करावीत. त्यामुळे भविष्यात त्या जागेवर नवी इमारत उभारली गेल्यास अशा बेघरांना प्राधान्याने घरे देण्याचा प्रयत्न महापालिका करणार आहे.

उघड्या मॅनहोल्सचा प्रश्न पुन्हा रडारवर

मुलाच्या मृत्यूबाबत ६ ऑक्टोबरला सुनावणी

मुंबई। मुंबई शहर व ठाणे जिल्ह्यातील पालिकांच्या क्षेत्रातील मॅनहोल्सचा प्रश्न पुन्हा एकदा उच्च न्यायालयाच्या रडारवर आला आहे. डोंबिवलीमधील १३ वर्षीय मुलाच्या मृत्यूच्या घटनेकडे लक्ष वेधण्यात आले असून याबाबत न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने ६ ऑक्टोबरला सुनावणी घेण्यास तयारी दर्शवली आहे. या सुनावणीवेळी न्यायालय महानगर क्षेत्रातील उघडे मॅनहोल्स व खड्ड्यांच्या प्रश्नावर प्रशासनाला निर्देश



देण्याची शक्यता आहे. रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसात डोंबिवलीतील उघड्या नाल्यात वाहून गेलेल्या १३ वर्षीय मुलाच्या मृत्यूने उघड्या मॅनहोल्सचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या मुद्द्यावर याचिका दाखल करणाऱ्या ॲड. रुजू ठक्कर यांनी मंगळवारी उच्च न्यायालयात या घटनेचा उल्लेख केला आणि या प्रकरणाची लवकर सुनावणी घेण्याची विनंती केली.

त्यावर न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने खड्डे आणि उघड्या मॅनहोल्सच्या प्रश्नावर ६ ऑक्टोबर रोजी एकत्रित सुनावणी घेण्यास तयारी दर्शवली. खड्ड्यांचा मुद्दा ६ ऑक्टोबर रोजी सुनावणीसाठी येईल, तेव्हा उघड्या मॅनहोल्सचा मुद्दा निदर्शनाला आणून द्या, असे खंडपीठाने याचिकाकर्त्या ठक्कर यांना सूचित केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com